# बृहन्मुंबई महानगरपालिका

**लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई – 22**

क्र. लोटिरु /8711/ रुप्र

दिनांक: 19/06/2025

## <u>जाहिरात</u>

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/6647 दि.30.05.2025 नुसार, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाकरिता डायलिसीस तंत्रज्ञ – 12 पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. सदर पदाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/For prospects/Careers-All या संकेतस्थळावर प्रस्तुत जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/ पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

डायलिसीस तंत्रज्ञ या पदासाठी अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारानी स्वतः खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता / अटींची पुर्तता करीत असुन सदर कंत्राटी पदाकरीता ते पात्र आहे. <u>उमेदवाराने अर्जात नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.</u>

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या डायलिसीस तंत्रज्ञ या पदाचा तपशील खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| पदाचे नाव | : | डायलिसीय तंत्रज्ञ |
| ठोक मानधन प्रति माह | : | रु. 20000/- |
| भरावयाच्या पदांची संख्या | : | 12 |
| कंत्राट कालावधी | : | नेमणूकीच्या तारखेपासुन ते 31.03.2027 |

1. डायलिसीस तंत्रज्ञ या पदाची अर्हता :

   अ. B.Sc.in Dialysis Technology from recognised university OR 12th passed with 1 year / 6 months certificate course in Dialysis Technology

   आ. उमेदवार 50 गुणांची मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

   इ. उमेदवार 'डीओईएससीसी' सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंबा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम. एस. सी. आय. टी.' किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केलेला असावा. तथापि

नियुक्तीच्यावेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने एमएससीआयटी ही परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या आत उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

2. वयोमर्यादा - उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.
3. निवडीचे निकष व कार्यपध्दती -

   अ. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल.

   आ. मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ : अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या email वर दोन दिवस आधी कळविण्यात येईल.
4. अर्ज करण्याचा कालावधी :

   दि. 23.06.2025 ते 04.07.2025
5. अर्जाचे शुल्क :

   रुपये 790/- + 18% जीएसटी रु. 143 = एकूण रु. 933/-

   सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परीस्थिती परत केले जाणार नाही.
6. अर्जाचे शुल्क भरण्याचा कालावधी : दि. 23.06.2025 ते 04.07.2025

   लोटिमस रुग्णालय, कॉलेज इमारत, तळ मजला, रोखपाल विभाग (रुम.नं.15) येथे इतके शुल्क दि. 23.06.2025 ते 04.07.2025 पर्यत कार्यालयीन वेळेत (सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 2.30 वाजेपर्यत भरून, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून, पूर्ण भरलेला अर्ज सोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडुन लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. 04/07/2025 रोजी संध्याकाळी 5.30 पर्यंत सादर करावा.
7. सर्वसाधारण अटी:
   - उमेदवाराचा ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पुर्ण असावा.
   - पात्र उमेदवाराना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र व पुर्वचारित्र प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
   - कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
   - त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 90 दिवसापूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.
   - उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व एका कॅलेंडर वर्षाला 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
   - कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.
   - त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.